# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,

**अवसरी (खुर्द),ता. आंबेगाव,जि. पुणे - ४१२४०५**

दुरध्वनी क्र.(०२१३३) २३०५८२ ,फॅक्स :(०२१३३) २३०५८३

ईमेल : gcoeara@gmail.com वेबसाईट :www.gcoeara.ac.in


जा.क्र.शाअवसंमअ/भांडार/२०१९/ 72 **4 JAN 2019**

**विषय: मुलांचे वसतिगृह खानावळ PRE-BID MEETING मध्ये उपस्थित करण्यात आलेले मुद्दे.**

महाविद्यालयातील मुलांचे वसतिगृह येथील खानावळीकरिता वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येऊन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यासाठी बुधवार दिनांक ०२/०१/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. संस्थेच्या कार्यालयामध्ये PRE-BID MEETING घेण्यात आली. त्या बैठकीमध्ये उपस्थित करण्यात आलेले मुद्दे खालीलप्रमाणे-

| अ. क्र. | निविदेतील मुद्दा क्रमांक नुसार उपस्थित केलेला मुद्दा | निविदेची सद्यस्थिती | उपस्थित मुद्द्याच्या अनुषंगाने घेण्यात आलेला निर्णय. |
|---|---|---|---|
| १. | पान क्रमांक १२ वरील मुद्दा क्रमांक ७.१<br><br>अनुभव प्रमाणपत्र किमान कोणत्या दोन वर्षाच्या कालावधीसाठी असावे? | किमान दोन वर्ष कालावधीसाठी व दररोज किमान १५० व्यक्तींसाठी खानावळ समाधानकारकरित्या चालविल्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. | अनुभव प्रमाणपत्र हे मागील ५ वर्षाच्या कालावधीतील, म्हणजेच दि. ०१-०१-२०१४ रोजीपासून पुढील किमान २ वर्ष काळातील कामाबाबतचे असावे. तसेच ते किमान १५० व्यक्तींसाठी खानावळ समाधानकारकरित्या चालविल्याबाबतचा सुस्पष्ट उल्लेख असलेले असावे. |
| २. | पान क्रमांक १२ वरील मुद्दा क्रमांक ७.३<br><br>GST नोंदणी प्रमाणपत्रासोबतच GST भरल्याचे अलीकडच्या काळातील (नोव्हेंबर २०१८) विवरणपत्र. | GST नोंदणीचे प्रमाणपत्र, मागील दोन वर्षांचे आयकर विवरण पत्र | GST नोंदणी प्रमाणपत्रासोबतच दि. ०१-०१-२०१८ पासून पुढील काळातील किमान दोन तिमाहीत GST भरल्याचे विवरणपत्र सादर करावे. |
| ३. | पान क्रमांक १२ वरील मुद्दा क्रमांक ७.३<br>१) आयकर विवरणपत्र एक वर्षाचे balance sheet सह असावे.<br>२. आयकर विवरण पत्र तपशिलासह. | मागील दोन वर्षांचे आयकर विवरण पत्र | मागील दोन वर्षांचे आयकर विवरणपत्र दाखल केल्याबाबतची पोचपावती सादर करावी. अन्य कागदपत्रे जोडण्याची आवश्यकता नाही. |

तसेच निविदेतील पान क्रमांक ०६ वरील मुद्दा क्रमांक २.७ नुसार "सर्वसाधारणपणे जेवण देण्याची वेळ सकाळी ९.०० ते ११.०० व सायंकाळी ७.०० ते रात्री ९.०० अशी राहील" असे नमूद केलेले आहे. परंतू निविदेतील पान क्रमांक १० वरील मेन्यू कार्ड मध्ये नजरचुकीने सायंकाळी जेवणाची वेळ ०७.०० ते ११.०० अशी नमूद केली आहे. **तरी सायंकाळची जेवणाची वेळ सायंकाळी ७.०० ते रात्री ९.०० अशी राहील, असे वाचावे.**

**इच्छुक निविदाकारांनी वरील सर्व बदलांची नोंद घेऊन त्यानुसार निविदा सादर कराव्यात असे सूचित करण्यात येत आहे.**

५/१/१९

**प्राचार्य**

**शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय**

**अवसरी (खुर्द), ता.आंबेगाव, जि.पुणे.**